# १०. पंडिता रमाबाई

**डॉ. अनुपमा उजगरे** (जन्म-१९४९) : प्रसिद्ध लेखिका. 'सांगी', 'पश्चात' हे काव्यसंग्रह; 'चांदणचुरा'; ललितलेखसंग्रह; 'पंडिता रमाबाई', 'लक्ष्मीबाई टिळक', 'विष्णुशास्त्री चिपळूणकर' इत्यादी चरित्रात्मक लेखन तसेच महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृती कोश प्रसिद्ध.

स्वत:चे संघर्षमय आयुष्य जगत असताना इतर स्त्रियांच्या आयुष्यात नंदनवन फुलवणाऱ्या पंडिता रमाबाईंचे प्रेरणादायी वर्णन लेखिकेने प्रस्तुत पाठातून केले आहे.



कोलकाता शहरात देशभक्त आनंद मोहन यांनी स्त्रियांसाठी जी खास सभा बोलावली होती, ती भारतातील स्त्रियांची पहिली सभा होती. पंडिता रमाबाईंना त्या वेळी बंगाली भाषा येत नव्हती, म्हणून त्यांनी मायबोलीसारखा सराव असलेल्या संस्कृत भाषेतून भाषण केले. बंगालीतून त्याचा अनुवाद त्या वेळी करण्यात आला. स्त्रियांची पहिली सभा, पहिली स्त्री वक्ता व सादर करण्यात आलेला पहिलाच मौखिक अनुवाद ही त्या सभेची वैशिष्ट्ये ठरली. स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवले जात असताना, एक परप्रांतातील परभाषक स्त्री महाभारतकालीन संदर्भ देऊन स्त्रियांच्या सभेत प्रबोधन करते, ही घटनाच फार आगळीवेगळी होती.

आई, वडील व बंधू यांच्या निधनानंतर एकटे जगणे किती कठीण आहे, हे अनुभवल्यावर रमाबाईंनी विवाह करण्याचे ठरवले. अतिशय विद्‌वान वकील म्हणून ख्याती असलेल्या बिपिनबिहारी मेधावी यांच्याशी त्या रीतसर विवाहबद्‌ध झाल्या. त्या वेळी त्यांचे वय बावीस वर्षांचे म्हणजे त्या वेळच्या रूढींच्या दृष्टीने फारच वाढलेले होते.

विवाहानंतर दोन वर्षांच्या आतच बिपिनबाबूंचे निधन झाले. महाराष्ट्रातील सुधारकांच्या विनंतीवरून रमाबाई आपल्या तान्ह्या मुलीला घेऊन पुण्यात आल्या. त्यांचे पहिले व्याख्यान न्यायमूर्ती रानडे यांच्या घरी झाले. तिथेच प्रत्येक आठवड्यात एकेका घरी त्यांचे व्याख्यान व्हावे असे ठरले. 'बाईमाणूस बोलते तरी कशी', हे पाहण्याची उत्कंठा प्रत्येक पुरुषाला लागली होती. 'व्याख्यानाला येणाऱ्याने आपल्यासोबत घरातल्या एका स्त्रीला आणल्याशिवाय प्रवेश मिळणार नाही, अशी पंडिताबाईंच्या व्याख्यानांच्या निमंत्रणपत्रिकेत एक अटच घातलेली असे.' अशी आठवण आपल्या सासऱ्यांबरोबर सभेला गेलेल्या काशीबाई कानिटकरांनी लिहून ठेवली आहे.

स्त्रियांनी शिकले व शिकवले पाहिजे, त्यासाठी आपल्या मातृभाषेचे अचूक ज्ञान प्राप्त केले पाहिजे. शिक्षिका म्हणून उभ्या राहण्यासाठी स्त्रियांना प्रोत्साहन म्हणून शिष्यवृत्त्या दिल्या पाहिजेत, अशी शिफारस त्यांनी हंटर कमिशनकडे केली.

अनाथ, अपंग, विधवा अशा स्त्रियांची सेवा करून त्यांना स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी कार्य करण्याचा आपला निश्चय रमाबाईंनी पुणे, मुंबई, अहमदाबाद इथल्या पुढाऱ्यांना व धनवानांना कळवला; पण अशा कार्याची समाजाला काही गरज आहे, हा विचारच काहींना पटला नाही. एका उदार गृहस्थाने दहा हजार रुपये देऊन त्या रकमेत रमाबाईंनी त्यांचे चाळीस हजार रुपयांत होणारे काम करून दाखवावे अशी अट घातली.

'मला भारतातील सर्व स्त्रिया सारख्याच आहेत. जेथपर्यंत माझ्या शरीरात रक्ताचा एक बिंदुमात्र आहे, तेथपर्यंत आपल्या स्त्री-जातीचे कल्याण व सुधारणा करण्याच्या कामापासून मी पराङ्‌मुख होणार नाही. स्त्री-जातीची सुधारणा करण्याचे व्रत मी धारण केले आहे.' रमाबाईंच्या ह्या उद्‌गारांवरून त्यांना एकूणच

स्त्री-जातीविषयी किती अपार प्रेम होते आणि त्यांचे दु:ख दूर करण्याविषयी किती तळमळ होती, हे दिसून येते.

रमाबाईंची कन्या मनोरमा परदेशातून ब्रेल लिपी शिकून आल्यामुळे अंध स्त्रियांच्याही शिक्षणाची सोय झाली. पंडिता रमाबाईंनी 'मुक्तिमिशन'ची स्थापना केली. 'मुक्तिमिशन' मध्ये जुजबी शिक्षण देऊन मुलींना स्वावलंबी करत असतानाच रमाबाईंनी एकेक लहान उद्योग-व्यवसाय सुरू केले. केळीच्या सोपट्यापासून टोपल्या बनवणे, वाखाच्या दोऱ्या वळणे, वेताच्या खुर्च्या विणणे, लेस, स्वेटर, मोजे विणणे, गाई-बैलांचे खिल्लार, शेळ्या-मेंढ्यांची चरणी, म्हशींचा गोठा, दूधदुभते, कुक्कुटपालन, सांडपाणी-मैल्यापासून खत, भांड्यांवर नावे घालणे, भांड्यांना कल्हई करणे, हातमागावर कापड-सतरंज्या विणणे, घाण्यावर तेल काढणे, छापखान्यातील टाइप जुळवणे-सोडणे, चित्रे छापणे, कागद मोडणे-पुस्तक बांधणे, दवाखाना चालवणे, धोबीकाम... असे कितीतरी प्रकारचे उद्योग स्त्रिया करत. ही त्या काळी फारच नवलाईची गोष्ट ठरली. अडीच हजार लोक बसू शकतील असे प्रार्थनामंदिर (चर्च) बांधताना काटकसर म्हणून रमाबाईंनी त्याचा आराखडा स्वत:च तयार केला आणि डोक्यावर विटांचे घमेले वाहून बांधकामाला हातभारही लावला. कुठलेही काम करण्यात त्यांनी कधीच कमीपणा मानला नाही. श्रमप्रतिष्ठेचा धडा त्यांनी आपल्या कृतीतून आश्रमातील मुलींना नेहमीच दिला.

रमाबाईंचे आयुष्य म्हणजे संघर्षांची आणि संकटांची एक दीर्घ साखळी होती; पण त्या खचल्या नाहीत. स्त्रीचा एक व्यक्ती म्हणून विचार आणि विकास करू पाहणाऱ्या पंडिता रमाबाई ह्या सहस्रकातील एकमेव कर्मयोगिनी व सत्शील साध्वी होत्या. त्या अशा सूर्यकन्या होत्या, ज्यांच्या नशिबी स्वत:च्या तेजामुळे आयुष्यात होरपळणे आले; पण त्यांनी अनेक वाळवंटी आयुष्यांचे नंदनवन करत कित्येक काळोखी आयुष्ये उजळवून टाकली!

---

**शब्दार्थ :** **अनुवाद** – भाषांतर. **ख्याती** – प्रसिद्धी. **पराङ्मुख** – तोंड, पाठ फिरवलेला, विन्मुख झालेला. **हातभार लावणे** – मदत करणे.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पंडिता रमाबाईंनी हंटर कमिशनकडे कोणती शिफारस केली?

(आ) पंडिता रमाबाईंना स्त्री-जातीविषयी अपार प्रेम होते, हे त्यांच्या कोणत्या उद्गारांवरून समजते?

(इ) पंडिता रमाबाई कष्टाळू व काटकसरी होत्या हे कोणत्या प्रसंगातून जाणवते?

**प्र. २. खालील चौकटी पूर्ण करा.**

(अ) पंडिता रमाबाईंचा विवाह यांच्याबरोबर झाला- [ ]

(आ) त्यांच्या मुलीचे नाव- [ ]

(इ) अंध व्यक्तींसाठी उपयुक्त लिपी- [ ]

(ई) सहस्रकातील कर्मयोगिनी- [ ]

**प्र. ३. पंडिता रमाबाईंनी मुक्तिमिशनमध्ये स्त्रियांसाठी सुरू केलेल्या लहान उद्योगांची नावे लिहा.**

**प्र. ४. पंडिता रमाबाईंसाठी पाठात आलेली विशेषणे शोधा व लिहा.**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा.**

उदा., गारवा — गार, रवा, वार, गावा, वागा.

(१) आराखडा (२) सुधारक

**(आ) असे तीन अक्षरी शब्द शोधा, ज्यांच्या मधले अक्षर 'रं' आहे. त्याची यादी करा.**

उदा., करंजी, चौरंग, कारंजे.........

**(इ) खाली दिलेल्या शब्दांचे पहिले अक्षर बदलून कंसात दिलेल्या अर्थाचा शब्द बनवा.**

उदा., खजूर (कामगार) — मजूर

(१) पुस्तक (डोके) —
(२) समता (माया) —
(३) घागर (समुद्र) —
(४) कडक (रस्ता) —
(५) गाजर (पाळीव प्राणी) —
(६) प्रवास (घर) —

**(ई) हे शब्द असेच लिहा.**

स्त्रिया, संस्कृत, वक्ता, संदर्भ, विद्‌वान, ख्याती, पराङ्‌मुख, दु:ख, श्रमप्रतिष्ठा, संघर्ष, दीर्घ, सहस्रक, आयुष्य.

## खेळ खेळूया.

- **खाली दिलेल्या चौकटींत म्हणी लपलेल्या आहेत, त्या ओळखा व लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| अ | णा | श | त्या |
| का | ति | चा | ल |
| हा | मा | बै | रि |

| | | | |
|---|---|---|---|
| ए | भा | ना | ध |
| रा | क | ड | ध्या |
| भ | चिं | र | X |

| | | | |
|---|---|---|---|
| ऐ | ज | चे | क |
| ना | का | वे | ना |
| म | रा | वे | चे |

| | | | |
|---|---|---|---|
| चो | शी | डू | शा |
| र | फा | न | न्या |
| सो | X | सं | ला |

| | | | |
|---|---|---|---|
| घ | घ | ती | X |
| रो | X | ली | च्या |
| री | मा | X | चु |

## शोध घेऊया.



- **महाराष्ट्रामधील प्रेरणादायी कार्य करणाऱ्या महिलांविषयीची माहिती आंतरजालावरून मिळवा.**

- **खालील मुद्द्यांच्या आधारे अर्थपूर्ण परिच्छेद तयार करा व त्याला योग्य शीर्षक द्या.**

सकाळची वेळ ·········· बाबांबरोबर फिरायला·········· झाडांवर बसलेले पाखरांचे थवे·········· किलबिल··········शुद्ध हवा ·········· आल्हाददायक वातावरण··········बाबांशी गप्पा मारत घराकडे परतणे ·········· दिवसभर ताजेतवाने वाटणे.

- **चौकटीत दिलेल्या उभयान्वयी अव्ययांचा योग्य वापर करून रिकाम्या जागा पूर्ण करा.**

| |
|---|
| परंतु |
| म्हणून |
| वा |
| तरी |
| आणि |
| किंवा |

(१) मंगल खंजिरी ······ टाळ छान वाजवते.

(२) काका आला ····· काकी आली नाही.

(३) कुंदाचा पाय मुरगळला ····· ती शाळेत येऊ शकली नाही.

(४) मला बूट ··········· चप्पल खरेदी करायची आहे.

(५) धोधो पाऊस पडत होता ········ मुले पटांगणावर खेळत होती.

(६) तुझी तयारी असो ···· नसो, तुला गावी जावेच लागेल.

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**



शाब्बास ! चांगले काम केलेस बाळा!



अरेरे ! फार वाईट झाले!



बापरे ! केवढा मोठा साप!



अहाहा ! पिसारा फुलवलेला मोर!

आपल्या मनात दाटून आलेल्या भावना आपण एखाद्या उद्गारावाटे व्यक्त करतो. वरील वाक्यांतील शाब्बास, अरेरे, बापरे, अहाहा ही **केवलप्रयोगी अव्यये** आहेत. या शब्दांमुळे आपल्या मनातील भावना प्रभावीपणे व्यक्त होतात. या शब्दांना उद्गारवाचक शब्द असेही म्हणतात.

- **खालील वाक्यांत कंसातील योग्य केवलप्रयोगी अव्यये घाला.**

(अरेरे, अबब, शी, चूप)

(अ) ·········· ! काय दशा झाली त्याची !

(आ) ·········· ! एक अक्षरही बोलू नकोस.

(इ) ·········· ! मला गबाळेपणा अजिबात आवडत नाही.

(ई) ·········· ! केवढा मोठा अजगर!

D2UINU

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना केवलप्रयोगी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांना शब्द, चित्र, चित्र व शब्द या वेगवेगळ्या स्वरूपांत अपूर्ण गोष्ट द्यावी व ती पूर्ण करून घ्यावी .